परंपरा लेखक - रमेश वाघमारे

"आपली चौदा दिवसाची क्रूज मायामीला सुरु होते," सत्यजित बॅनर्जी आपली ब्रिटिश पत्नी पोलिन, मित्र अभय प्रधान व त्याची पत्नी सरिता ह्यांना समजावत होता. ते चार पंचाहत्तरी उलटलेले ज्येष्ठ नागरिक कॅरीबियन क्रूजला निघाले होते. "प्रत्येक दोन-तीन दिवसांनी जहाज जॉर्ज टाऊन, कोलंबिया, पनामा, व मेक्सिकोमधील एखाद्या निसर्गरम्य बेटावर एक दिवसाचा हॉल्ट घेईल. तेथे उतरून आपण ती बेटे पाहू. मग लॉस एंजेलिस येथे जहाज आपल्याला उतरवून देईल."

नऊ मजली इमारतीसारखी दिसणारे ते जहाज पाहून मंडळींचे डोळे दिपले व ते चढत्या पोलादी जिन्यावरून आत गेले. जहाजावरील जलपरींनी त्यांचे स्वागत केले. त्यातही सोनेरी केसांची व निळ्या डोळ्यांची एक सुंदर तरुणी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. तिचे नाव 'जेनी' होते हे तिला एकदा तिच्या सखीने हाक मारली त्यावरून कळले.

सामान टाकून सर्वांनी संबंध जहाज पाहून घेतले. जेवणाचा मुख्य हॉल, त्याशिवाय पाच सहा 'स्पेशलटी रेस्टोरां', दुपारी, पाश्चात्य संगीत, नवीन भाषा, वगैरे शिकण्याची सोय, व रोज रात्री मनोरंजनाचे कार्यक्रम हे वाचून सर्वजण खूष झाले. शिवाय त्यांच्या दिमतीला रेबेका नावाची स्ट्यूअर्डेस दिली होती.

ब्रेकफास्ट, लंच, संध्याकाळचे मदिरा सेवन व रात्रीचे जेवण सर्व बरोबर करीत. इतर वेळी जो तो आपापल्या आवडीनिवडीप्रमाणे एकमेकांबरोबर किंवा एकटा जाई. ह्याला अपवाद दुपारची 'हाय टी'. आठव्या मजल्यावर दुपारी चार ते पाच होणारा हा कार्यक्रम अभय कधीही चुकवत नसे. इतर सहप्रवासी दुपारची वामकुक्षी घेणे पसंत करीत. 'हाय टी'त कॉफी-चहा बरोबर अनेक खाद्य पदार्थ असत; पण अभयला आकर्षण होते ते स्ट्रिंग क्वार्टेट, गायनाची मेडलि, नकला, वगैरे त्यावेळी होणाऱ्या कार्यक्रमांची. रात्रीचे कार्यक्रमही चांगले असत, पण संगीताच्या कार्यक्रमात 'ए.आर. रहेमान'चे 'जय हो', 'आवो डान्स करे' हे भारतीय संगीताचे नमुने म्हणून जेनी व तिचे सहकलाकार पेश करीत हे त्याला खटकले होते. त्या संचापैकी कुणी कधी भेटले तर त्यांना आपले हे मत सांगायचा त्याने निश्चय केला.

एकदा दुपारी अभय उठला व त्याने घड्याळात पाहिले तो पाच वाजले होते. तो लगबगीने आठव्या मजल्यावर गेला. वेटरने त्याला चहा व मफीन आणून दिले. अभय त्या रिकाम्या हॉलमधे एकटा एका टेबलावर बसला. त्याने चहाचा एक घोट घेतला तोच अचानक जेनी अवतीर्ण झाली.

"हलो, आज तुम्हाला उशीर झालेला दिसतोय. पण ते ठीक आहे. येथे सव्वा पाच ते सव्वा सहा आमच्या संचाचा कार्यकम आहे, म्हणून मी तयारी करायला आले आहे," असे बोलून ती त्याच्यासमोर बसली. अभयने आपली 'जय हो' बद्दलची तक्रार तिला सांगितली व सुरेल हिंदुस्तानी संगीताची उदाहरणे दिली.

“आपण एकदा सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या डायनिंग हॉलमधे भेटू. पण त्याआधी उद्या ‘हाय टी’ला याल का?”

अभय ‘हो’ म्हणाला.

अभय व जेनी एकाच वेळी रेस्टोरांमध्ये पोहोचले. दोघांनी कॉफीचा एक घोट घेतला न घेतला तोच हातात एक्स्प्रेसो कॉफीचा लहानसा कप घेतलेली बर्नी लॉरेन्स नावाची सर्वपरिचित आपत्ती एका खुर्चीवर येऊन बसली. अभय व जेनीने एकमेकांकडे पाहिले. पण जणू काही ते दोघे आपले एकतर्फी विनोद ऐकण्यास उत्सुक आहेत अशा थाटात त्याने बोलणे सुरु केले. जेनीला वाटले तो अभयचा मित्र आहे म्हणून ती आदराने त्याच्या विनोदाला तोंडदेखले हसत होती. त्यांच्या सुदैवाने बर्नीला पलीकडच्या टेबलावर नुकतेच आलेले दांपत्य दिसले व त्याने नव्या जोमाने आपला मोर्चा तिथे वळवला.

"इथे थोड्या लोकात आपल्याला निवांतपणे बोलायला मिळत नाही, तर पाचव्या मजल्यावरच्या सर्वांना खुले असणाऱ्या बुफे हॉलमध्ये तर विचारायलाच नको!” जेनी म्हणाली. “म्हणून मी "स्पेशल डायनिंग रूम' मध्ये आपल्या दोघांच्या जागा राखीव करायला सांगते. मी आधीच जहाज कंपनीकडून दोन-अडीच तास मोकळा वेळ मागून घेईन. तो केव्हा मिळेल हे मी फार आधीपासून सांगू शकणार नाही."

"काही हरकत नाही. पण माझ्या बरोबर माझी पत्नी व दुसरं एक दांपत्य आहे. त्यांना मी ....."

"जरूर आण, का नाही? म्हणजे माझीही ओळख होईल.”

अभय आपल्या कॅबिनमध्ये गेला. सुदैवाने बॅनर्जी पती-पत्नीही तेथेच होती. त्याने सर्वांना उत्साहाने त्याच्या जेनीशी झालेल्या संवादाचा अहवाल दिला.

"मला आपली एक संध्याकाळ कुणा अनोळखी व्यक्तीशी काढायची नाही," पोलिन कडाडली. "तू जा."

सरिताने, "मी माझ्या संगीत प्रेमापायी किंवा तंबोऱ्याची साथ करायला गायक-वादकांबरोबर कधी कधी लहानसहान दौरे केले आहेत; माझी हरकत नाही तुम्ही तिच्याबरोबर जेवायला गेलात तर," असा दिलासा दिला.

"आणखी एक गोष्ट," पोलिन पुढे म्हणाली. "तू नव्हता तेव्हा आमची एका दांपत्याशी ओळख झाली व आम्ही आज संध्याकाळी साडेआठला त्यांच्याबरोबर 'मरिना' मध्ये फिश खायला जाणार आहोत."

पोलिनने आपले बोलणे संपवले न संपवले तोच फोन खणाणला.

"अभय, मी जेनी बोलतेय. मला आज संध्याकाळची सुट्टी मिळाली व म्हणून मी आज सातचे 'स्पेशल रेस्टोरां'मध्ये रेझर्वेशन केले आहे."

अभयने इतरांना ही बातमी सांगितली.

सत्यजीत लगेच म्हणाला, "मग तू त्या मुलीबरोबर जा व जेवण संपल्यावर आमच्या रेस्टोरांमध्ये ये."

एव्हाना साडेसहा वाजले होते म्हणून अभय तयारीला लागला. तो तयार होऊन जायला निघाला तो पोलिनने त्याला हटकले.

" अभय, लक्षात ठेव," पोलिन म्हणाली. "फारसं शिक्षण नसलेल्या व सैल नीतिमत्तेच्या मुलीच जहाजावर नृत्य-गायन करायला येतात. मला तर ही मुलगी 'सोनं खोदणारी' वाटते. तू तुझं पाकीट घरीच ठेऊन जा कसा. कंपनीने जेवणाचे पैसे आधीच तिकिटातून वसूल करून घेतले आहेत. वाईन वगैरे मागवली तर बिलावर तुझ्या कॅबिनचा नंबर दे."

अभयने निमूटपणे तिजोरीत पाकीट ठेवले व तो बाहेर जायला निघाला. सत्यजीत त्याच्याबरोबर बाहेर आला.

" अभय, she's a hot chick."

अभयला ते आवडले नाही.

"सत्या, तू म्हणतो ते मला व साऱ्या जहाजाला माहित आहे. पण आज पहिल्यांदा एका पाश्चात्य व्यक्तीला आपल्या अद्वितीय संगीताची महती सांगण्याची संधी मिळतेय म्हणून मी जातोय."

अभय गेला तर जेनी त्याची वाट पहात होती. बारटेंडर काय पिणार हे विचारायला आला.

"अभय, मी अर्धी बाटली रेड वाईन मागवते; प्रत्येकाला दोन ग्लास येतील." अभयने हो म्हटले. (पण मनात 'सोनं खोदणं सुरु झालं वाटतं!' अशी पाल चुकचुकली.)

अभयने सॅमन मागवला, जेनीने चिकन. रेस्टोरांमधील प्रत्येक जण आपल्याकडे पहात आहे असा त्याला भास झाला.

"तुला हे मनोरंजन कर्त्याचे काम कसे मिळाले? तुझे येथील आयुष्य मला तरी रोमांचकारक वाटते," अभयने विचारले.

"हो, आहेच ते. प्रत्येक मुलीला येथे काम करण्याचे स्वप्न असते, कारण येथे स्टेजवर तुमची कला दाखविण्याचा अनुभव मिळतो; इतकेच नव्हे, तर आम्हाला शिक्षकांकडून नृत्य, गायन व अभिनय ह्या तिन्ही कला शिकायला मिळतात."

"पण त्यासाठी निवड होणे फार कठीण असेल."

"एका मोठ्या दिव्यातूनच जावे लागते म्हणाना. जहाजावरील परीक्षक आमची ह्या तिन्ही कलात चाचणी घेतात व शेकडो उमेद्वारातून पन्नास निवडतात. मग त्यांची कसोशीने परीक्षा घेऊन आमचा पंचवीस कलाकारांचा संच बनवतात . आम्ही मनोरंजन करीत नसतो तेव्हा इतरही कामे करावी लागतात."

"म्हणजे तुमचे काम सोपे नाही."

"हो, पण मला सगळी कामे आवडतात. शिवाय जहाज आमचे राहण्याचे व खाण्यापिण्याचे लाड करते व पैसाही चांगला मिळतो."

"तुला भाऊ वगैरे?" अभय. प्रश्न विचारल्यावर त्याला आपण तो विचारायला नको होता असे वाटले. पण जेनीने ते मनावर घेतले नाही.

"हो, मला एक भाऊ आहे, तो न्यूयॉर्कमधील जे.पी. मॉर्गन ह्या वॉलस्ट्रीटवरील कंपनीत अर्थविश्लेषकाचे काम करतो."

"वाह, छान. पण तुला ह्या कलांची आवड कशी लागली?"

"माझ्याकडे मिशीगन युनिव्हर्सिटीची एम. एफ. ए. - म्हणजे मास्टर ऑफ फाईन आर्टस्ची- पदवी आहे."

आता अभयला बाहेर दिसणाऱ्या अथांग सागरात उडी मारावी असे वाटू लागले. सुदैवाने समुद्र व त्याच्यामधे एक मोठी बे-विंडो होती.

"आता तुमच्या संगीताबद्दल मला सांग. पण फार टेक्निकल बोलू नको," जेनीने विचारले.

"अगदी बरोबर बोललीस. मी तुला सांगतो ते कदाचित अर्धसत्य असेल. पण तुमच्या- आमच्या संगीतातील एक मोठा फरक म्हणजे तुमचे संगीत भौतिक आनंद देण्यासाठी आहे. ते माणसाला बहिर्मुख करते; याउलट आमचे संगीत ऐकणाऱ्याला अंतर्मुख करते व हळूहळू समाधीप्रत नेते. गायक किंवा वादक आपले संगीत ईश्वराकडे पोहोचण्याचा एक मार्ग समजतो. अर्थात आमच्या संगीतातही शृंगार, वीर, करूण वगैरे रस असतातच."

"शृंगार रस तुमच्या स्पिरिच्युअल संगीतात कसा बसतो?"

"तीच तर गंमत आहे. वरकरणी दोन मानवी जीवांमधील शृंगाराबद्दल गायक गात असला तरी तो त्याला श्रीकृष्ण-राधा किंवा पुरुष-प्रकृती , जीव-शिव ह्यांच्या एकात्मतेचे प्रतीक समजतो."

" अभय, हे फार जड झालं," जेनी हसत म्हणाली. अभयने मग तिला थोडक्यात ह्या आध्यात्मिक कल्पनांबद्दल सांगितले. ती लक्षपूर्वक ऐकत होती. ते सांगताना अभय कागदावर आकृत्या काढत होता व लिहीत होता.

" दुसरा फरक म्हणजे तुमच्या संगीतात गायक किंवा वादक जी रचना गात किंवा वाजवत असेल, त्याचे नोटेशन त्याच्यासमोर असते. हिंदुस्थानी संगीतात ते नसते. त्यात निरनिराळे ‘राग’ असतात व प्रत्येक रागाचे थोडे नियम असतात. पण हे नियम इतके शिथिल असतात की ते पाळून कलाकाराला त्याच्या कल्पनाशक्तीला मोकळी सोडण्यास भरपूर वाव मिळतो. स्वैर आलापी हा आमच्या संगीताचा आत्मा आहे- *जो जवळ जवळ तुमच्या संगीतात नाहीच.* म्हणून प्रत्येक गायक तोच राग निरनिराळ्या तऱ्हेने गातो."

अभयचे कागदावर लिहीणे चालूच होते.

“तुमचे संगीत निरनिराळ्या वाद्यांच्या मेळातून निर्माण होते,” तो पुढे म्हणाला; “त्यामुळे निरनिराळ्या वाद्यांना व त्यांच्या वादकाला आपापली वेगळी वैशिष्ट्ये दाखवण्यास वाव मिळत नाही. आमच्याकडे अनेक वाद्ये आहेत व ते वाजविणारे एकल कलाकार आहेत.”

“आता शेवटले सांगतो. जुन्या शास्त्राप्रमाणे प्रत्येक रागाची वेळ ठरलेली असते व एक राग अनेक रस व भावना व्यक्त करीत असला तरी त्याच्या सुरात मुख्यत्वे एकच रस असतो.”

जेनी त्याच्याकडे लहान मूल आवडते खेळणे मिळाल्यावर कसे डोळे विस्फारून पहाते तशी पहात होती.

"पण हे मी ऐकल्याशिवाय मला कसे कळणार?"

"Right on, young lady! मी तुला सर्व प्रमुख गायकांच्या व वादकांच्या निरनिराळ्या वेळी वाजवल्या जाणाऱ्या रागांच्या लहान लहान क्लिप्स पाठवीन. त्या तू ऐक आणि तुला काय वाटते ते तीन दिवसांनी मला सांग."

"नक्की! मी कितीही बिझी असले तरी ऐकेन!"

अभयने घड्याळाकडे पाहिले. जवळ जवळ अडीच तास कसा गेला हे कळले नव्हते.

वेट्रेसने वारुणीचे बिल आणले. अभयने ते उचलण्याआधी ते जेनीने उचलले.

"मला देऊ दे," अभय अजीजीने म्हणाला.

"नाही, *मी* तुला जेवायला बोलावलंय; शिवाय आम्हा मनोरंजनकर्त्यांना आपल्या मर्जीच्या पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यासाठी एक भत्ता मिळतो, त्यातून मी हे बिल देत आहे."

नवीन अनुभवाचा आनंद अभयच्या रोमारोमात भिनला होता. आता आपण आपल्या मित्रांना भेटलो की ते आपल्याला उत्सुकतेने "कसं झालं?" असं विचारतील असे त्याला वाटले. पण तसे काही झाले नाही. तो जाऊन रिकाम्या खुर्चीवर बसला पण त्याची कुणीही दखल घेतली नाही. मग त्यानेच नव्या पाहुण्यांशी स्वतःची ओळख करून दिली. अर्धा तास झाला तरी कुणी त्याच्याशी बोलेना म्हणून तो उठला व डेकवर गेला.

तीन दिवसानंतर तो जेनीच्या फोनची अपेक्षा करीत होता. पण दोनच दिवसांनी तिचा फोन आला.

" अभय, मी तू पाठविलेलं सर्व संगीत ऐकलं. आज दुपारी 'हाय टी' ला आमच्या संचाचा कार्यक्रम आहे; त्या आधी तू पंधरा मिनिटे लवकर ये, म्हणजे आपल्याला बोलता येईल, " ती उत्साहाने म्हणाली. अभयने इतरांना ही बातमी सांगितली, पण पोलीनने सर्वांतर्फे “We have plans” असे उत्तर दिले.

अभय गेल्यावर जेनी त्याच्यासमोर बसली. “अभय,” ती भारावून म्हणाली, “तुझं संगीत ऐकून मला एका वेगळ्या जगात गेल्यासारखं वाटलं. आणि तू पाठविलेले बरेचसे सकाळचे व संध्याकाळचे राग त्या त्या वेळीच गायला हवे असेही वाटले.”

“तुझे कान चांगले आहेत,” अभय म्हणाला.

कार्यक्रम संपला. तो उठणार तोच त्याच्या खांद्यावर कुणीतरी टॅप केले. त्याने पाहिले तो ती जेनी होती.

"मी तुला माझ्या संचाशी ओळख करून देते."

"Sure" अभय म्हणाला व गेला.

"जेनीने आम्हाला तुम्ही सांगितलेली सर्व माहिती दिली व आम्ही सर्वांनी तुमचे नवे संगीत ऐकले," त्यांचा दिग्दर्शक म्हणाला. "आमच्या कार्यक्रमात विविधता आणण्यासाठी आम्हाला त्याचा नक्कीच उपयोग होईल. तुमच्याबरोबर आम्ही फोटो घेऊ शकतो काय?"

अरुणने ' अहो विचारता काय? एरवी आम्हाला कोणी कुत्रं विचारत नाही," हे सांगण्याचा मोह आवरला.

"मग मला आधी फक्त अभय बरोबर फोटो हवाय," जेनी जवळ येऊन त्याला बिलगत म्हणाली. जेनीनंतर सर्व संचाने अभयला मध्यभागी ठेऊन आपला फोटो घेवविला.

"अभय, तुझी ईमेल दे. मी तुला फोटो पाठवीन," जेनी म्हणाली.

त्यानंतर जेव्हा जेव्हा अभय डेकवर किंवा इतर ठिकाणी फिरताना दिसला की जेनी लगबगीने त्याच्या बरोबर चालू लागे किंवा त्याला एखाद्या शांत जागी बसवून संगीतावर प्रश्न विचारणे सुरु करी.

तिच्याबरोबर मित्र किंवा मैत्रिण असली तर ती त्यांना सर्रास सोडून देई. अभयला ते आवडत असले तरी आपल्याला कुणी पाहील ही धाकधूक त्याला त्रस्त करी.

दोन दिवसानंतर व्हॅलेंटाइन्स डे होता. चौघे प्रवासी आपले जेवण घेऊन विस्तीर्ण गच्चीत गेले, व मधोमध श्वेत वारुणीची बाटली ठेऊन गप्पा मारीत जेवणाचा मझा घेऊ लागले. मग ते मनोरंजनाच्या कार्यक्रमाला गेले. तो संपल्यावर अभयला झोप येत होती म्हणून तो आधी कॅबीनकडे जाण्यास निघाला. कॅबिनजवळ आला तो त्याला एक भलेमोठे, जवळ जवळ दोन फूट लांबीचे व एक फूट रुंदीचे व्हॅलेंटाईन डे कार्ड दाराला चिकटवलेले दिसले. अभयने ते उघडले तर त्यात ते कुणाकडून आले व कुणासाठी होते ही माहिती नव्हती. फक्त लिहिले होते, "Thanks for having dinner with me. I am sure what you taught me will change my life and music for the better".

इतक्यात मागून त्याला सरिताचा प्रश्न ऐकू आला, "कुणाचं आहे ते एवढं मोठं कार्ड?"

"काही माहित नाही. चुकून कुणीतरी आपल्या दारावर चिकटवलंय."

तेवढ्यात रेबेका तिथे आली.

"रेबेकाला द्या; ती ते ज्याचे त्याला पोहोचवेल." असे म्हणून सरिता आत गेली. रेबेका अभय जवळ आली व अगदी हळू आवाजात म्हणाली, "सर, ते कार्ड तुमच्यासाठी आहे. ती मनोरंजन संचातील जेनिफर ते चिकटवायला आली होती तेव्हा मी इथे होते. मी तिला 'हे कॅबिन प्रधान सरांचं आहे' असे सांगताच ती म्हणाली, ‘मला माहित आहे.’ द्या मला मी त्याची विल्हेवाट लावते.”

जहाजातून उतरायची वेळ झाली. कॅप्टन, जेनी, मुख्य अधिकारी, मनोरंजन संचाचा दिग्दर्शक असे पाच-सहा जण निरोप देण्यासाठी उभे होते. अभय जेनीजवळ गेला तेव्हा तिने, "अभय, हे कॅप्टन ब्रेंडन अलेक्झांडर, माझे फियान्से," अशी त्याची ओळख करून दिली.

"तुम्ही जेनीला बहुमोल मदत केली ह्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. या इकडे, मी तुम्हाला कॅप्टनची एक पिन भेट म्हणून देतो."

अभय गेला.

"मिस्टर प्रधान," आपले शब्द तोलीत कॅप्टन ब्रँडन म्हणाले. "तुमचा समाज एकूण स्त्रियांच्या बाबतीत पुराणमतवादी व भावना रोखून धरणारा आहे हे मला माहित आहे. पण त्यात माणुसकीला अवसर नसावा हे बरोबर नाही. विशेषतः अमेरिकेत तीस वर्षे राहूनही तुमची वागणूक अशी घुसमटलेली का?" असे म्हणून त्यांनी आपल्या निळ्या ब्रिफकेसमधून जेनीने अभयला पाठविलेले व्हॅलेंटाईन्स डे कार्ड काढले. अभयला धक्का बसला.

"तुम्ही जेनीला जी माहिती दिली त्यामुळे ती तुम्हाला दैवताप्रमाणे मानू लागली, कारण संगीत हा तिचा ध्यास आहे. तिने मला तुमच्याबद्दल सांगून 'मला माझ्या भावना व्यक्त करता येतील असे कार्ड आणून द्या,' असे आवर्जून सांगितले. आणि तुम्ही ते कार्ड परत पाठविले? बरं झालं रेबेका ते घेऊन आली तेव्हा जेनी तेथे नव्हती. नाही तर तिची काय अवस्था झाली असती ह्याची मला कल्पनाहि करवत नाही."

"I am really sorry," अभय म्हणाला.

“दोन आभाराच्या ओळी लिहिल्या असत्या तर तिला किती बरं वाटलं असतं! जाऊ द्या.”

"bresssndsssssn," जेनीने हाक मारली. "लवकर इथे ये, लोक आपला निरोप घेतायेत."

-----------------------------------------------------------------------------------------------